**दस्तावेज क्र. ३७**


# महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण

Maharashtra Water Resources Regulatory Authority (MWRRA)
9th Floor, Centre-1, World Trade Centre, Cuffe Parade, Mumbai-400005
Tel. 2215 2019 Fax : 2215 3765 E_mail : mwrra@mwrra.org


क्रमांक : मजनिप्रा/२०१६/विधि विषयक/प्र.क्र. ४/२०१६/२७८

दि. १२/०६/२०१७

**प्रकरण क्रमांक ४/२०१६**

**मंजुर झालेल्या तपशिलवार प्रकल्प अहवालाप्रमाणे धोम आणि बलकावाडी प्रकल्पामधे, अधिनियम २००५ च्या कलम २२ (३) अन्वये, पाण्याचे वाटप करण्याविषयी.**

यासोबत दि. १२/०६/२०१६ चा मजनिप्रा आदेश जोडला आहे.

सहपत्रः वरील प्रमाणे

स्वाक्षरित

डॉ. सुरेश कुळकर्णी

(सचिव)

प्रतिः माहिती व आवश्यक कार्यवाही करिता,

१) ॲड. एस. आर. पलांदे, लायर्स चेंबर क्र. ए–१, जिल्हा न्यायालय संकुल, शिवाजीनगर, पूणे, श्री. नंदकुमार दगडु माने (पाटील) व इतर, रहिमतपूर, ता. कोरेगाव, जि. सातारा–४१५५११ यांच करिता

२) सचिव, (ज.सं.व्य व ला.क्षे.वि.), ज. सं. विभाग, मंत्रालय, मुंबई–४०००३२ (लक्षवेध– श्री. संजय टाटु, उ.स., सिं.व्य.)

३) कार्यकारी संचालक, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, सिंचन भवन, बार्ने रोड, मंगळवार पेठ, पूणे—४११०११

४) मुख्य अभियंता (वि.प्र.) ज. सं. वि. सिंचन भवन, बार्ने रोड, मंगळवार पेठ, पूणे—४११०११

५) जिल्हाधिकारी, सातारा, जिल्हाधिकारी कार्यालय, पोवई नाका, सातारा, ४१५००१ (लक्षवेध—श्री संतोष जाधव, उ. वि. अ. फलटण)

६) अधिक्षक अभियंता, सातारा सिंचन प्रकल्प मंडळ, सिंचन भवन, कृष्णानगर, सातारा, ४१५५०३

७) अधिक्षक अभियंता, सातारा सिंचन मंडळ, सिंचन भवन, कृष्णानगर, सातारा, ४१५५०३

८) अधिक्षक अभियंता, पूणे सिंचन प्रकल्प मंडळ, १० बंड गार्डन रोड, कौन्सिल हाल समोर, पूणे—४११००१

९) ॲड. व्ही. एस. टाळकुटे, ५, १ला माळा, पारेख व्होरा चेंबर, ६६, नगीनदास मास्टर रोड, मुंबई, ४००००१, चंद्रकांत जगताप, व १० लाभार्थी मार्फत, हनुमंत पाणी वापर संस्था, फलटण.

# महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण

Maharashtra Water Resources Regulatory Authority (MWRRA)
9th Floor, Centre-1, World Trade Centre, Cuffe Parade, Mumbai-400005
Tel. 2215 2019  Fax : 2215 3765  E_mail : mwrra@mwrra.org


**प्रकरण क्रमांक ४/२०१६**

**मंजुर झालेल्या तपशिलवार प्रकल्प अहवालाप्रमाणे धोम आणि बालकवाडी प्रकल्पामधे, अधिनियम २००५ च्या कलम २२ (३) अन्वये, पाण्याचे वाटप करण्याविषयी.**

अपीलकर्ता :

१) श्री. नंदकुमार दगडु माने (पाटील), अध्यक्ष, श्री. चंद्रगिरी कालवा पाणी वापर सहकारी सेवा संस्था, रहिमतपूर, जि. सातारा

२) श्री. अविनाश जयंत माने, अध्यक्ष, काळभैरव कालवा पाणी वापर सहकारी सेवा संस्था, रहिमतपूर, जि. सातारा

३) श्री. शिवाजी कोंडीराम माने, पवनपुत्र कालवा पाणी वापर सहकारी सेवा संस्था, रहिमतपूर, जि. सातारा,

सर्व ॲड. सुरेश रामचंद्र पलांदे मार्फत,

**विरुध्द**

**हस्तक्षेपक (इंटरव्हीनर्स)**

श्री. विलास नामदेव नलावडे व इतर,

हनुमंत (वाटर युजर्स) पाणी वापर सहकारी संस्था, म.

रा. अलजापुर, ता. फलटण, जि. सातारा

सर्व, ॲड. व्ही. एस. टाळकुटे मार्फत,

आणि

**प्रतिवादी :**

(१) प्राथमिक तंटा निवारण अधिकारी (PDRO) व मुख्य अभियंता (प. क्षे.) ज.सं.विभाग, सिंचन भवन, बार्ने रोड, मंगळवार पेठ, पूणे–४११०११

(२) सचिव, (ज.सं.व्य व ला.क्षे.वि), ज. सं. विभाग, मंत्रालय, मुंबई–४०००३२

(३) जिल्हाधिकारी, सातारा, जिल्हाधिकारी कार्यालय, पोवई नाका, सातारा, ४१५००१.

(४) मुख्य अभियंता (वि.प्र.) ज.सं. वि. सिंचन भवन, बार्ने रोड, मंगळवार पेठ, पूणे–४११०११

(५) अधिक्षक अभियंता, सातारा सिंचन प्रकल्प मंडळ, सिंचन भवन, कृष्णानगर, सातारा, ४१५५०३

(६) अधिक्षक अभियंता, सातारा सिंचन मंडळ, सिंचन भवन, कृष्णानगर, सातारा, ४१५५०३

(७) कार्यकारी संचालक, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास, महामंडळ, सिंचन भवन, बार्ने रोड, मंगळवार पेठ, पूणे–४११०११

**आदेश**

**कोरम : श्री. के. पी. बक्षी, अध्यक्ष**

**श्री. व्ही. एम. कुळकर्णी, सदस्य**

**(ज. स. अभियांत्रिकी)**

**दि. १२/०६/२०१७**

याचिकाकर्त्यांनी प्राधिकरणासमोर (प्र. क्र. १५/२०१५) नोव्हेंबर २०१५ मधे, मजनिप्रा अधिनियम, २००५ च्या कलम २२ (३) अन्वये धोम आणि धोम–बलकावाडी जलाशयांच्या पाण्याचे वितरण व्हावे या मुख्य प्रार्थनेसह, अर्ज दाखल केला होता. त्यानंतर श्री. नितिन नलावडे, यांनी १० इतर हनुमंत (डब्ल्यु. यु. ए.) पाणी वापर संस्था फलटणच्या लाभार्थीतर्फे इंटरव्हेंशन अर्ज दाखल केला, जो दि. ८ डिसेंबर २०१५ ला प्राप्त झाला. प्राधिकरणाने दि. १४/१२/२०१५ ला सुनावणी घेतली होती आणि

कार्यक्षेत्राच्या कारणावरुन अर्ज निकाली काढला होता. म. ज. नि.प्रा. अधिनियमात असलेल्या तरतुदी प्रमाणे गाऱ्हाणे/वाद आधी प्राथमिक तंटा निवारण अधिकारी (पीडीआरओ) यांचे स्तरावर निकाली काढावयाचा असतो. त्याप्रमाणे, प्राधिकरणाने त्यांच्या दि. २१/१२/२०१५ चे आदेश निर्गमित केले. त्याची प्रत हस्तक्षेपकांना दिली होती.

याचिकाकर्त्यांनी नंतर पीडीआरओ कडे अर्ज दाखल (मुख्य अभियंता, ज.सं. पूणे कडे) केला. त्यांनी त्यांच्या दि. ०५/०४/२०१६ च्या आदेशाव्दारे अर्ज नामंजुर केला. याचिकाकर्त्यांनी पीडीआरओच्या आदेशाविरुध्द प्राधिकरणाकडे दि. ०२/०५/२०१६ ला अपील दाखल केले. त्या अपीलास प्रकरण क्र. ४/२०१६ असा क्रमांक देण्यात आला; आणि त्यावर दि०. १०/०८/२०१६ आणि १९/१०/२०१६ अशा २ सुनावण्या घेण्यात आल्या. त्यात कोरम म्हणुन श्रीमती मालिनी शंकर, अध्यक्ष व श्री. व्ही. गिरीराज, सदस्य (ज.सं. इकॉनामी) हे मजनिप्राच्या समितीवर होते. सुनावणी दरम्यान इंटरव्हीनर्सनी कोणतेही मुद्दे मांडले नाही. परंतु, त्यांनी दि. २४/१०/२०१६ चा इंटरव्हेंशन अर्ज दाखल केला. त्यामुळे अंतिम सुनावणी १९/१२/२०१६ ला ठेवण्यात आली. श्रीमती मालिनी शंकर यांच्या स्थानांतरणामुळे, ही सुनावणी होऊ शकली नाही. तसेच त्या समितिचा कार्यकाल सुध्दा ०६/०१/२०१७ ला संपला.

नंतर शासनाने प्राधिकरणासाठी नवीन समिति स्थापित केली, समितिचे अध्यक्ष श्री. के. पी. बक्षी, तर सदस्य श्री. व्ही. गिरीराज होते. त्यांनी दि. १३/०४/२०१७ व २६/०४/२०१७ ला २ सुनावण्या घेतल्यात. प्रकरण पुर्ण झालेले नव्हते आणि शासनाने प्राधिकरणाचे पुनर्गठन दि. ५ मे २०१७ च्या अधिसूचनेव्दारे अध्यक्ष व सदस्य (ज.सं. अभियांत्रिकी) यांना नियुक्त करुन केली. या बदलामुळे पुनश्च नवीन सुनावणी घेणे अपरिहार्य झाले; त्याप्रमाणे सुनावणीची तारीख २२ मे २०१७ ठरली.

याचिकाकर्त्यांनी जो अनुतोष/ दिलासा मागितला तो असा आहे.

१) याचिकाकर्त्याचे अपील मंजुर करण्यात यावे.

२) पीडीआरओ यांचा दि. ०५/०४/२०१६ चा आदेश रद्द करावा

३) डीपीआर मधे दिल्याप्रमाणे धोम आणि धोम–बलकावाडी यांच्या मधील ठरलेल्या पाणी वाटपाप्रमाणे आदेश द्यावेत.

४) दोन्ही जलाशयातुन होणाऱ्या पाणी वाटपाची योजना निश्चित करावी.

५) धोम–बलकावाडीचे पाणी केवळ खरीप हंगामात निरा–उपखोऱ्यात सोडण्याची तरतुद आहे. त्यामुळे रबी हंगामात किंवा उन्हाळयात आवर्तन करु नये. त्याप्रमाणे आदेश निर्गमित करावे.

६) धोम–बलकावाडी प्रकल्पाची योजना जास्तीचे पाणी व धोम उपखोऱ्यात वापर न झाल्यास, त्या आधारावर तयार केली असल्यामुळे, जो पर्यंत धोम धरणात १०० टक्के पाणी भरत नाही, तोपर्यंत त्याचे पाणी निरा उपखोऱ्यात सोडु नये.

७) धोम आणि धोम–बलकावाडी पैकी कोणते जलाशय आधी भरावे? जर पाण्याचा दुष्काळ धोमच्या लाभ क्षेत्रात पडला आणि जर पाण्याच्या जर योग्य वापराचा आणि कालनिश्चित, शास्त्रोक्त योजना नसलेला कार्यक्रम घेतला नसेल तर लाभ क्षेत्रातील शेतकरी व जनावरे यांना त्याचा फटका बसेल. हे येथे स्पष्ट करायला हवे की, दोन्ही प्रकल्पांच्या उपखोऱ्यात उपलब्ध असणाऱ्या पाण्यावर परमाधिकार आहे.

८) धोम कालव्यावर असणारी उपसा सिंचन योजना रबी हंगाम संपल्यावर बंद करण्यात यावी, कारण ही योजना केवळ ८ महिने सिंचन लाभासाठी झाली आहे.

९) दुसरा कोणताही योग्य व न्यायोचित आदेश दिला जावा.

## २२ मे २०१७ ची सुनावणी

प्रारंभी प्राधिकरणाने नवीन सुनावणी घेणे या प्रकरणात कसे ठरले याची कारण मिमांसा विषद केली, ज्यावर सर्व संबंधितांनी संमती दशविली.

**१. याचिकाकर्त्यांतर्फे ॲड. पलांदे यांनी खालीलप्रमाणे बाजू मांडली.**

१) मजनिप्रा अधिनियम, २००५ च्या प्रास्तविकात दिल्याप्रमाणे जल संपत्तीचे राज्यात नियमन करणे, सुकर करणे तसेच न्यायोचित, समसमान आणि कायम स्वरुपी व्यवस्थापन, वाटप आणि वापर करण्यासाठी, मजनिप्राची तरतुद केली आहे. त्याच्या उद्देशात, पाणी वापराचे राज्यात नियमन करण्यासाठी मजनिप्रा ची स्थापना केल्याचे सांगितले आहे.

२) पी.डी.आर.ओ. ने घेतलेल्या निर्णयात स्पष्टता नाही. त्यांनी दिलेले निर्देश ज. सं. विभागाला किंवा याचिकाकर्त्यांसाठी अर्थपुर्ण नाहीत.

३) धोम प्रकल्प १९७७ मधे पुर्ण झाला. हा प्रकल्प बारमाही म्हणुन योजित केला होता. तर धोम बलकावाडी प्रकल्प हा मुलतः ४ महिने खरीप हंगामात लाभ देण्यासाठी होता. नंतर तो ८ माही प्रकल्प करण्यात आला आणि त्याला म. कृ. खो. वि.महामंडळाने मंजुरी दिली. त्यांनी ३ऱ्या सुधारित तपशिलवार प्रकल्प अहवालाच्या (डिपीआर) पान ४२ वरील प्रकरण ४ (पाणी नियोजन) कडे लक्ष वेधले आणि सांगितले की धोम बालकवाडी लाभ क्षेत्राचे पाणी १५ ऑक्टोबर नंतर वळवु नये. त्यांनी पुढे सांगितले कि, धोम प्रकल्पाला सुधारित प्रशासकिय मान्यता (आरएए) जुन २००२ मधे प्राप्त झाली आणि त्यानुसार, अंदाजे २.७५ टीएमसी (धोम प्रकल्पाचे) अधिकचे पाणी वापरुन धोम जलाशयाच्या वरच्या भागात धोम—बालकवाडी धरण बांधण्यात यावा. प्रकल्पाला केन्द्रिय जल आयोगाची परवानगी मिळाली नाही. धोम बालकवाडी प्रकल्पाचा वापर केवळ जलाशय म्हणुन केला जातो ज्यातुन धोम—जलाशयात पाणी सोडण्याची योजना आहे, ज्यामधुन दोन्ही धोम आणि धोमबालकाडी लाभ क्षेत्राची कालवा वितरण यंत्रणा सुरु होते.

४) धोम—बालकावाडी चे परिर्वतन ८ महिन्यात केल्यामुळे, धोमप्रकल्पाच्या लाभ क्षेत्रातील सिंचनावर त्याचा विपरित परिणाम झाला आहे. आणखी म्हणजे, ज्या पाण्याचे वाटप पेयजल म्हणुन करायला पाहिजे ते सिंचनासाठी वापरले जाते.

५) धोम जलाशयाचे पाणी बोगद्यामार्फत निरा उपखोऱ्यात जाते. त्याचा उपयोग पेयजल व सिंचन म्हणुन सातारा जिल्हयातील भोर खंडाळा व फलटण तालुक्यांमधे होतो. डी.पी. आर. नुसार, धोम—बालकावाडी चा पाणी वापर फक्त खरीप हंगामासाठी मंजुर आहे.

त्यामुळे धोम—बालकावाडी जलाशयाचे पाणी निरा उपखोऱ्यात खरीप हंगामानंतर वळवु नये.

६) सध्या धोम प्रकल्पाचे १८,१०० हेक्टर ऐवजी केवळ ९,५०० हेक्टर विकसित झाले आहे. धोम लाभ क्षेत्रात असलेले पाण्याचे दुर्भिक्ष हे क्षेत्र पुर्णता विकसित झाल्यावर तीव्रतेचे जाणवेल.

७) वाई, कोरेगाव व साताऱ्या तालुक्यातील शेतकऱ्यांचा जमिनी धोम धरणाच्या बांधकामासाठी घेतल्या होत्या. जरी ४२ गावातील प्रकल्प पीडितांचे पुनर्वसन झाले असले तरी धोम जलाशयातील पाण्यावर त्यांचा पहिला हक्क आहे.

८) धोम बालकावाडी प्रकल्पाची मंजुरी व बांधणी अशी आहे की, पाण्याचा वापर २.७५ टीएमसी च्या वर केवळ खरीप हंगामात करता येईल. परंतु त्यापेक्षा जास्त पाणी वापरले जाते, हे खालील आकडयांवरुन स्पष्ट होते.

| | | |
|---|---|---|
| २०१२—१३ | २०१३—१४ | २०१४—१५ |
| ३.०२ टीएमसी | ३.८३ टीएमसी | ३.७८ टीएमसी |

९) धोम—बालकावाडी प्रकल्पाच्या डी.पी.आर मधे दिलेल्या अटीप्रमाणे धोम—बालकावाडी च्या लाभ क्षेत्रात पाणी वापर हा अशाप्रकारे होईल की ज्यामुळे धोम लाभ क्षेत्रात विपरित परिणाम होणार नाही. त्यामुळे, अटीनुसार अशी काळजी घेणे आवश्यक आहे की, कृष्णा प्रकल्पाचे पाणी नियोजन बिघडणार नाही. या महत्त्वाच्या अटीचे सध्या उल्लंघन होत आहे.

**ब) श्री. नंदकुमार माने, रा. रहिमतपूर यांनी खालीलप्रमाणे त्यांचे म्हणणे सादर केले.**

१) धोम प्रकल्पाची बांधणी करताना ५० टक्के विश्वसनीय लाभ तर धोम—बालकवाडीच्या रचनेनुसार त्यातुन ७५ टक्के विश्वसनीय लाभ विचारात घेतला आहे. याचा अर्थ असा आहे की, धोम जलाशय १०० टक्के ५० वर्षात अवरुध्द होईल तर धोम—बालकावाडीला १०० टक्के अवरूद्ध ७५ वर्षे लागतील. यामुळे हे स्पष्ट होते की, १०० टक्के अवरुध्द होण्याचा धोम बालकावाडीची वारंवारिता धोम पेक्षा जास्त आहे.

२) त्यांनी असे सुध्दा सांगितले की, धोम—बालकावाडी प्रकल्प ४ महिन्यापासुन ८ महिने वाढवल्यावर निरा—देवधर प्रकल्पातील पाणी नियोजनात ०.९३ टीएमसी पाणी धोम—बालकावाडी लाभ क्षेत्राकरिता वळवण्याची तरतुद केली नाही ज्यामुळे धोम बालकावाडी लाभ क्षेत्राची रबी पिकाची १.७५ टीएमसी पाण्याची गरज पुर्ण होऊ शकेल.

क) श्री. विजय घोगरे, अधिक्षक अभियंता, एसआयपीसी, सातारा, यांनी खालीलप्रमाणे, त्यांचे मुद्दे सादर केले.

१) गेल्या ३६ वर्षाच्या काळात धोम जलाशय २९ वर्षात १०० टक्के पुर्ण भरले. धोम—बालकावाडीच्या मंजुर डीपीआर नुसार नियोजित वापर २.७५ टीएमसीचा आहे. ज्यात ०.०५ टीएमसी च्या बाष्पीभवनाचा समावेश आहे. लाभार्थीकडुन होत असलेल्या सततच्या मागण्या आणि जन प्रतिनिधीकडुन धोम—बालकावाडी लाभ क्षेत्रात खरीप व रबी हंगामात जास्त पाण्याची मागणी होत असल्याने शासनाने तत्परता दाखवुन २१/६/२००२ ला या प्रकल्पाला ८ माही मधे परिवर्तित करण्यास परवानगी दिली. सुधारित पिकाच्या आकृतिबंधाला मिळालेल्या मंजुरीप्रमाणे दुष्काळप्रवण असलेल्या सातारा जिल्हयाच्या भोर, खंडाळा आणि फलटण तालुक्याला खरीप व रबी हंगामात पाणी दिले जाते. उष्ण वातावरणात दुर्भिक्षते पासुन सुटका मिळावी यासाठी एक उपाय म्हणुन दुर्भिक्षता कमी करण्याच्या कार्यक्रमानुसार पाणी सोडले जाते.

२) ४ माही पासुन ८ माही मधे प्रकल्प परिवर्तित केल्यामुळे सिंचनाची गरज ३.३६ टीएमसी पर्यंत वाढली त्यापैकी १.७५ टीएमसी पाणी रबी हंगामासाठी आहे. ०.९३ टीएमसी ची जी कमतरता आहे ती निरा—देवघर प्रकल्पातुन पुर्ण करण्याकरिता प्रस्तावित केले आहे; ज्याची कालवा व वितरण यंत्रणा अजुन ही पुर्ण व्हायची आहे.

३) त्यांच्या कार्यालयाने ३ ऑगस्ट २०१६ च्या पत्रान्वये परिच्छेदागणिक उत्तर सादर केले आहे. धोम—बालकावाडी प्रकल्पासाठी बदललेल्या पाणी नियोजनाची मंजुरी मिळण्यासाठी दि. ४ एप्रिल २००० ला पत्र दिले होते ज्यामुळे प्रकल्प ८ माही करण्यात आला. प्रकल्पाला म. कृ. खो. वि. महामंडळाने पहिली सुधारित प्रशासकिय मंजुरी (आरएए) दि.

४ जुलै २००२ च्या पत्रान्वये दिली. त्यावेळी ही मंजुरी देण्याचे अधिकार म. कृ. खो. वि. महामंडळाला होते; त्यामुळे ही मंजुरी सक्षम प्राधिकाऱ्याकडुन मिळाल्याचे समजले जात होते. परंतु याचिकाकर्त्यांनी या सत्यस्थिति कडे दुर्लक्ष केले आहे.

४) धोम—बालकावाडी प्रकल्पाचे जलाशय कृति समयपत्र (आरओएस) तयार करतांना धरण सुरक्षा पुस्तिकेत दिलेल्या मार्गदर्शक तत्वांप्रमाणे केले आहे; (प्रकरण ७ पुराचे भाकित, जलाशय कृति तसेच धरणाचे दरवाजे कृति). धोम—बालकावाडी धरणाच्या आरओएसला मुख्य अभियंता (वि.प्र.) पूणे यांनी एप्रिल २०१५ मधे मंजुर केले आहे. धोम—बालकावाडी जलाशय हा साठवण तलाव असल्याने, डीपीआर मधे दिलेल्या तरतूदी लक्षात घेवुन तसेच सिंचन व बिगर सिंचन उपयोगासाठी ऑक्टोबर पर्यंत प्रत्यक्षात लागणारी गरज विचारात घेवुन, त्याची कमी होण्याची पातळी सक्षम प्राधिकाऱ्याकडुन ठरवली जाते. त्यांनी हे देखील निदर्शनास आणुन दिले की कालवा सल्लागार समितिने शिफारस केल्यानुसार धोम आणि धोम—बालकावाडी जलाशयाचे पाणी वापर नियोजन केले आहे. कालवा सल्लागार समितिच्या सभेचे उष्ण हवामान सिचंन कार्यक्रम २०१६—१७ चे कार्यवृत्त जोडुन त्यांनी आपल्या म्हणण्याला बळकटी दिली.

५) जो प्रस्ताव त्यांच्या कार्यालयाने दि.३ एप्रिल, २०१७ ला तयार केला होता, ज्यामधे धोम प्रकल्पाचा सहभाग ११.६९ टीएमसी (ज्यात २.६४ टीएमसी पेयजल) समाविष्ट आहे, तो विषद केला. धोम प्रकल्पासाठी २.७० टीएमसी धोम—बालकावाडी प्रकल्पाकडुन सोडल्या जाईल, याची खातरजमा केली. दुर्भिक्ष तथा दुष्काळ स्थिति असणाऱ्या काळात, धोम लाभ क्षेत्राच्या सिंचनाला प्रथम प्राधान्य दिले जाईल. हा प्रस्ताव याचिका कर्त्यांना मान्य असल्याची पोच याचिकाकर्ता क्र. १ यांच्या १३ एप्रिल, २०१७ च्या पत्राव्दारे मिळाली आहे. धोम लाभ क्षेत्रातील उपसा सिंचन योजना २८ फेब्रुवारी नंतर बंद ठेवण्याची गरज आहे.

६) धोम—बालकावाडी प्रकल्पाच्या एच आर ची सील पातळी ७३२.८९ मी. असावी, ज्यामुळे त्याच्या लाभक्षेत्रात पाणी सोडता येईल. या पातळी खाली पाण्याचा संग्रह ४. २५ टीएमसी, जो धोम प्रकल्पाच्या लाभ क्षेत्रासाठी आहे. आणखी म्हणजे, धोम—

बालकावाडीच्या ३.९६ टीएमसी पाण्यापैकी, १.१७ टीएमसी पाणी धोम प्रकल्पाला जो कृष्णा प्रकल्पाचा घटक आहे, वापरण्यासाठी उपलब्ध राहील.

**ड) श्री. व्ही. एस. टाळकुटे हस्तक्षेपक (Interveners) तर्फे** :– १) त्यांचे शपथपत्र तयार करण्यापुर्वी त्यांना पाणी वाटप, पिकांचा आकृतिबंध, गेल्या १० वर्षात धोम लाभ क्षेत्रात झालेला पाणी वापर इ. माहिती मागितली. त्यांनी आपले शपथपत्र उत्तरात सादर केले आणि ते म्हणाले की, प्राथमिक वि.वि. अधिकाऱ्यांनी **(PDRO)** हस्तक्षेपकांना (इंटरव्हिनर्स) निमंत्रण दिले, ज्यांच्या विषयी त्यांचा हस्तक्षेपक म्हणुन मजनिप्राच्या दि.२१/१२/२०१५ (प्र.क १५/२०१५ मधे) विशेष उल्लेख केला आहे; आणि त्यांना या आदेशाची प्रत देण्यात आली होती. जर मजनिप्राने या अपीलाला परवानगी दिली, तर हस्तक्षेपकांना हायकोर्टात जाण्याशिवाय दुसरा पर्याय राहणार नाही. त्यामुळे हे प्रकरण परत पीडीआरओ पाठवावे, कारण त्यांचा इंटरव्हेंशन अर्ज, मजनिप्राने ही केस निकालात काढण्यापुर्वी स्विकारला आहे. तरी त्यांना कोणतीही सूचना दिली नव्हती, त्यामुळे पीडीआरओंनी नैसर्गिक न्यायाच्या मुळ तत्वाचे पालन केले नाही.

२. याचिकाकर्त्यांनी सत्य स्थिति उघड केली नाही. आणि बऱ्याच गोष्टी दडवल्या आहेत असे सांगुन आवश्यक कागदपत्रे त्यांनी सादर केलीत.

३. अधिक्षक अभियंता, एसआयपीसी, सातारा यांच्या ३ एप्रिल २०१७ च्या प्रस्तावाला, ज्यामधे धोम लाभ क्षेत्राला पुरेसा पाणी पुरवठा होण्याची खातरजमा केली आहे, त्यांच्या वरिष्ठांची मंजुरी नसल्यामुळे हा प्रस्ताव वैध नसल्याने, जरी तो याचिकाकर्त्यांना मान्य असला, तरी तो नामंजुर करावा.

४. प्रकल्प पिडीतांचे हक्क सुरक्षित राहावे म्हणुन म. कृ. खोरे वि. महामंडळाने पिकांचा आकृतिबंध, २.७० टीएमसी धोमचे जास्तीचे पाणी वापरुन, तसेच निरा–देवघरचे ०.९३ टीएमसी पाणी वापरुन, ८ माही करणे न्यायोचित आहे. धोम–बालकावाडीतुन सोडलेल्या पाण्याचा रबी आणि उष्ण हवामानात सिंचनासाठी निरा उपखोऱ्यात अनधिकृत वापर होतो, ही गोष्ट अमान्य केली. खरी परिस्थिति अशी आहे की, धोमचे लाभार्थी त्यांना प्राप्त

हक्कापेक्षा जास्त पाणी वापरतात. हे कालवा सल्लागार (का.स.) समितित धोम प्रकल्पाच्या उष्ण वातावरण २०१६–१७ च्या बैठकीच्या कार्यवृत्तावरुन स्पष्ट होते. खरं म्हणजे धोम प्रकल्पाच्या लाभ क्षेत्राचे शेतकरी, त्यांना वाटप झाल्यापेक्षा, जास्त पाणी वापरत आहेत.

५. धोम प्रकल्पाच्या डीपीआर प्रमाणे पेयजलासाठी २.६४ टीएमसी आणि औद्योगिक वापरासाठी ०.२३ टीएमसी पाण्याची तरतुद आहे. ज. सं. वि च्या ७ मार्च, २००१ शासन निर्णयाप्रमाणे, दुष्काळाच्या स्थितीत, शासनाला पेयजल आरक्षित करण्याचे अधिकार आहेत. हे पाणी कालवा सल्लागार समितिच्या शिफारशीनुसार जिल्हयात कोठेही वापरता येते. हे पेयजल याचिकाकर्ते रबी व उष्ण हवामानात सिंचनासाठी वापरत आहेत. म्हणजेच सिंचनासाठी पाणी वापराच्या सिमेच्या वर पाणी वापर करीत आहेत. खरे म्हणजे यासाठी त्यांना मुभा द्यायला नको. त्यामुळे त्यांच्या व्यथेमधे कांही कारण दिसत नाही.

६. वरील शासन निर्णयानुसार जेव्हा धोम–बालकावाडी जलाशय त्याच्या क्षमतेच्या ३३ टक्के चल साठवण असेल, तेव्हाच खरीप हंगामात सिंचन करता येईल. १५ ऑक्टोबर आणि १ मार्चला किती पाणी जलाशयात उपलब्ध आहे त्यानुसार रबी आणि उष्ण हवामानाच्या हंगामात सिंचनाचे नियोजन केले जाते. हे कालवा सल्लागार समितीच्या शिफारशी नुसार होते.

७. धोम–बालकवाडी मधे साठवण केलेल्या पाण्यावर याचिकाकर्त्यांचा प्राधान्याने हक्क आहे हे त्यांना अमान्य आहे. दोन्ही प्रकल्प वेगळे आहेत ज्यासाठी भोर, खंडाळा व फलटण तालुक्यांतील पीडितांचे पुनर्वसन करण्यासाठी केले होते. जेव्हा धोम प्रकल्पाची सिंचन व पेयजलाची गरज भागवल्यानंतर जास्तीचे पाणी राहील, त्या पाण्याचा उपयोग भोर, खंडाळा व फलटण तालुक्यांतील दुष्काळ प्रवण क्षेत्रासाठी करता येईल. यामुळे लोकांची तथा जनावरांची गरज पुर्ण होईल.

याचिकाकर्त्यांवर कुठलाही अन्याय झाला नाही त्यामुळे कार्यवाहींचे काही कारण नाही असे सांगुन त्यांनी आपले कथन पुर्ण केले. याचिकाकर्त्यांचे हक्क पुर्णपणे सुरक्षित आहे, त्यामुळे त्यांनी केलेले अपील खारीज करावे.

**ई) श्री. आर. जी. तांबे, सहयाद्री सहकारी साखर कारखाना, यशवंतनगर**

ते म्हणाले की, धोम प्रकल्प झाल्यामुळे ४२ गावातील प्रकल्प पिडीतांचे पुनर्वसन वाई, कोरेगाव व सातारा तालुक्यात करण्यात आले. तथापि, पुच्छ टोकावर असलेले धोम उजवा किनारा कालव्यावरील शेतकऱ्यांना क्वचितच कालव्याच्या पाण्याचा लाभ होतो. त्यामुळे पाण्याचे वाटप धोम–बालकवाडी प्रकल्पाच्या मुळ डीपीआर नुसार केले जावे, यावर त्यांनी भर दिला.

**फ) श्री. एस. एन. बोलभट, कार्यकारी अभियंता, निरा–देवघर प्रकल्प विभाग, संगवई. (भातघर)**

१) प्राधिकरणाने, रोजनामाच्या संदर्भात झालेल्या दि. २६ एप्रिल २०१७ च्या सुनावणी मधे, जे निर्देश दिले होते त्याच्या परिपुर्तीसाठी, अधिक्षक अभियंता, पीआयपीसी, पूणे यांचे पत्र सादर केले. याचिकाकर्ता क्र. १ यांनी २६/४/२०१७ च्या पत्राने निरा–देवघर प्रकल्पाबद्दल कांही माहिती विचारली होती.

२) असे दिसुन आले की, निरा–देवघर प्रकल्पाचे पाण्याचे सुधारित नियोजनाला मंजुरी म. कृ. खो. वि. महामंडळाच्या दि. २५/०४/२००० च्या पत्राव्दारे मिळाली आहे. त्यानुसार धोम–बालकावाडी प्रकल्पाचा सुधारित अहवाल तयार करुन दि. ०४/०७/२००२ च्या पत्राने म. कृ. खो. वि. महामंडळाची मंजुरी मागितली. दि. १६/१०/२००२ च्या निर्णयाने म.कृ.खो.वि. महामंडळाने निरा–देवघर प्रकल्प दुसरा अहवाल मंजुर केला. निरा–देवघर प्रकल्पाच्या पाणी नियोजनावरील नोटसोबत हे पत्र जोडले आहे.

३) निरा–देवघर प्रकल्पातुन ०.९३ टीएमसी पाण धोम–बालकवाडी प्रकल्पात त्याला ८ माही करण्याकरीता, वळवण्यासाठी मुख्यत: म. कृ. खो. वि. महामंडळाने मंजुरी दिली आहे. त्यानुसार धोम बालकवाडीचा सुधारित प्रकल्प अहवाल, ज्यात ०.९३ टीएमसी पाणी मिळण्याची तरतुद केली आहे, सादर करण्यात आला. तथापि, निरा–देवघर प्रकल्पाच्या दुसऱ्या सुधारित अहवालात अनवधानाने या प्रस्तावाची तरतुद केलेली नाही.

**मुद्दे :**

१) इंटरव्हीनर्सनी हस्तक्षेप अर्ज, वादाच्या प्रारंभिक अवस्थेत (प्रकरण क्र. १५/२०१५ च्या कामकाजात), दाखल केला. तो अर्ज प्राधिकरणाच्या दि. २१/१२/२०१५ च्या आदेशाने निकाली काढण्यात आला. प्रकरण मुख्य अभियंता (ज.सं.), पूणे यांचेकडे पीडीआरओ म्हणुन पाठविले. पीडीआरओ कडे झालेल्या कामकाजात इंटरव्हीनर्स ना ज्यांच्या अर्जाला प्राधिकरणाने परवानगी दिली होती पण पीडीआरओने नोटीस पाठविली नव्हती. पीडीआरओ च्या या कार्यवाहीमुळे इंटरव्हीनर्सवर (हस्तक्षेपीवर) अन्याय झाला. अशा रितीने मुळात मुद्दा हा आहे की, प्रकरण पीडीआरओ कडे पाठविण्याची गरज होती काय? ज्यामुळे हस्तक्षेपीला त्यांचे मत मांडण्याची मुभा मिळाली.

२) पीडीआरओ कडे पुन्हा हे प्रकरण पाठवणे योग्य होते काय? कारण त्यांचा ५ एप्रिल, २०१६ चा आदेश याचिकाकर्ताच्या म्हणण्यानुसार स्पष्ट नव्हता. तसेच त्यात अर्जामधे दिलेल्या कळीच्या मुद्दांवर उल्लेख नव्हता.

३) अधिक्षक अभियंता, एस. आय. पी. सी यांचा दि. ०३/०४/२०१७ चा आदेश, हस्तक्षेपींच्या विनंतीप्रमाणे, खारीज करावा काय?

४) याचिकाकर्त्या करिता कार्यवाही साठी कांही कारण अस्तित्वात आहे काय?

**निरिक्षणे :–**

१) नैसर्गिक न्यायाचे तत्वाप्रमाणे न्यायालयाकडे जाण्याचा आणि वादात असलेल्या मुद्दांचे निराकरण होण्यासाठी प्रत्येकाला समान संधी मिळायला पाहिजे. प्राधिकरणाने, हस्तक्षेपींच्या हस्तक्षेप अर्जाला त्यांच्या दि. २१/१२/२०१५ च्या, आदेशाने परवानगी दिली. हस्तक्षेप करणाऱ्या पक्षाला, पीडीआरओ कार्यालयात झालेल्या कामकाजात भाग घेण्यासाठी बोलावायला पाहिजे होते. पण तसे झाले नाही, आणि ती पीडीआरओची चूक आहे.

२) पीडीआरओ ने त्यांच्या दि. ०५/०४/२०१७ च्या आदेशात अर्जाला परवानगी दिली. तथापि, त्यांच्या आदेशात अर्जात दिलेले सर्व मुद्दे विचारात घेतले नाही. पीडीआरओ आदेशात स्पष्टता नाही तसेच ते तर्कसंगत नाही, पीडीआरओने त्यांच्या पुढे ठेवलेल्या

मुद्दांवर स्पष्ट निर्देश देणे गरजेचे होते, त्यामुळे क्षेत्रात काम करणाऱ्यांना कामाबद्दल मार्गदर्शन मिळाले असते.

३) अधिक्षक अभियंता, एस.आय.पी.सी., सातारा यांनी दि. ०३/०४/२०१७ च्या पत्रात चंद्रगिरी पाणी वापर संस्था, रहिमतपुरा यांना विविक्षित बांधीलकी दर्शविली आहे. त्यावर हस्तक्षेपींनी या प्रस्तावावर आक्षेप नोंदवला आहे की, अशा बांधिलकी साठी त्यांना वरिष्ठ अधिकाऱ्यांनी प्राधिकारीत केले नव्हते. जर पीडीआरओ ने याचिकाकर्त्याच्या मुद्यांचा विचार केला असता तर ३ एप्रिल २०१७ च्या प्रस्तावाची गरज भासली नसती.

४) अधिक्षक अभियंता, एसआयसी, सातारा यांनी सादर केलेल्या दरवर्षीच्या पाणी वापराच्या माहितीवरुन असे दिसते की, वर्ष २०१४–१५ सोडल्यास (दुष्काळ वर्ष), धोम जलाशयातुन दरवर्षी धोमप्रकल्पाच्या लाभार्थ्यांना त्याचा विधिग्राहय हिस्सा मिळाला आहे. तथापि, याचिकाकर्ता व पाणी वापर संस्थांना, जे कालव्याच्या पुच्छ शेवटाला आहेत, त्यांना त्यांचा वाजवी हिस्सा प्राप्त झाला नाही.

**आदेश :–**

वर दिलेल्या मुद्दांचे तोलन करुन व प्रकरणाची तपासणी केल्यावर, प्राधिकरणाने खालीलप्रमाणे आदेश दिले आहेत.

१. हस्तक्षेपींना त्यांची सुनावणीकरिता असलेल्या हक्काची संधी द्यायला हवी, ज्यामुळे त्यांचा प्रारंभीचा अर्ज ध्यानात घेवुन ते त्यांचे म्हणणे मांडु शकतील. त्यामुळे हे प्रकरण पीडीआरओकडे ताजी सुनावणी घेण्यासाठी व त्याची सर्व संबंधित पक्षांना नोटीस निर्गमित करण्यासाठी पाठवित आहे. पीडीआरओ हा आदेश मिळाल्यावर ३० दिवसांच्या आत ताजी सुनावणी घेतील.

२. पीडीआरओ ला निर्देश देण्यात येत आहेत की, त्यांनी अर्जात दिलेले सर्व संबंधित मुद्दे जे त्यांच्या समोर मांडले जातील, विचारात घेवुन स्वयंस्पष्ट असलेले आदेश द्यावेत. या आदेशामुळे क्षेत्रात काम करणाऱ्यांना मार्गदर्शिका म्हणुन वापरता येईल, अशी अपेक्षा आहे; तसेच त्यामुळे संबंधित व अर्थपुर्ण

असलेली त्यांच्या पाणी हक्काची माहिती विविध हितकर्त्यांना मिळेल. सुनावणी झाल्यावर पीडीआरओ त्यांचे आदेश १ महिन्याच्या आंत निर्गमित करतील.

३. पीडीआरओ निर्धारित करतील की, याचिकाकर्ते पाणी वापर संस्थांना त्याचा पाण्याचा हक्काचा हिस्सा मिळतो की नाही, नसल्यास (त्याचे कारण शोधुन), आवश्यक निर्देश देतील ज्यामुळे याचिकाकर्त्यांच्या हिताचे संरक्षण होईल.

४. अधिक्षक अभियंता, एसआयपीसी, सातारा यांनी दिलेला दि. ०३/०४/२०१७ चा प्रस्ताव याव्दारे खारीज केला आहे.

तथापि, हा पीडीआरओ चा प्रश्न आहे की, कथित प्रस्तावामधील संबंधित माहिती, पडताळणी केल्यानंतर, त्यांच्या निर्देशात अंतर्भुत करावी की नाही.

वर दिलेल्या निष्कर्ष आणि निर्देशानंतर, हे अपील निकालात निघाले आहे.

स्वाक्षरित
श्री. व्ही. एम.कुळकर्णी, सदस्य
(ज.सं.अभियांत्रिकी)

स्वाक्षरित
श्री. के. पी. बक्षी,
अध्यक्ष

स्वाक्षरित
डॉ. सुरेश कुळकर्णी
(सचिव)